महाराष्ट्र शासन

# पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली

Padmabhushan Vasantdada Patil Government Hospital, Sangli

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज या संस्थेशी संलग्न शैक्षणिक रुग्णालय**

2374651 to 2374654(PBX) Fax No.: 0233/2374585 Email: pvpghsangli@yahoo.co.in

जा.क्र.पवपाशारुसां/आस्था-२/वै.अधि.रक्त् अधि/रिक्त् पदे/जाहिरात/२५३८-५३ /२०२३, दि.०६/०३/२०२३

## - जाहिरात -

विषय:- वैद्यकीय अधिकारी व रक्त् संक्रमण अधिकारी या संवर्गातील रिक्त पदे स्थानिक/विभागीय निवड मंडळामार्फत (डी.एस.बी.) थेट मुलाखतीद्वारे तात्पुरत्या स्वरुपात रुग्ण सेवेची निकड घेवून १२० दिवसांकरिता भरण्याबाबत...

संदर्भ:- १) वैद्यकीय अधिक्षक व प्रशासकीय अधिकारी,प.व.पा.शा.रु.सांगली यांनी दिनांक ०२-०३-२०२३ रोजी दिलेल्या आदेशानुसार

२) शासन निर्णय क्र.डीएसबी-१२०१/सीआर/२७६/२००१/वैसेवा-३, दिनांक १०-०८-२००१

३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,शासन निर्णय क्रमांक:एमईडी-२०१९/प्र.क्र.२६२/वैसेवा-३, दिनांक ३१ डिसेंबर २०२०

४) दिनांक ०२-०३-२०२३ रोजीची मंजूर टिप्पणी

शासकीय वैद्यकीस महाविद्यालय मिरज सलग्न पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगली येथील वैद्यकीय अधिकारी व रक्त् संक्रमण अधिकारी यांची खालील नमूद रिक्त पदे संदर्भ क्र.१ नुसार प्राप्त आदेशानुसार तसेच रिक्त पदांच्या आढाव्यानुसार संस्थास्तरावर स्थानिक / विभागीय निवड मंडळामार्फत थेट मुलाखतीद्वारे १२० दिवसांकरिता विहित पद्धतीने, या संस्थेच्या संकेतस्थळावर खालील अटी व शर्तीच्या आधारे जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

| संस्थेचे नाव- पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगली | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | पदनाम | रिक्त पदे | एकत्रित ठोक मानधन |
| ०१ | वैद्यकीय अधिकारी | ०२ | शासन निर्णय क्रमांक:एमईडी-२०१९/प्र.क्र.२६२/वैसेवा-३ दिनांक ३१ डिसेंबर २०२० अन्वये MBBS शैक्षणिक अर्हता रु.७५,०००/- व पदवी,पदविका धारण केलेले रु.८५,०००/- |
| ०२ | रक्त् संक्रमण अधिकारी | ०१ | |

<u>अटी व शर्ती -</u>

१) पद्मभूषण वसंतदादा पाटील,शासकीय रुग्णालय सांगली या आस्थानेवरील ज्या नियमितपणे वैद्यकीय अधिकारी /रक्त् संक्रमण अधिकारी गट-ब या पदावर एम.बी.बी.एस अथवा त्यानंतर पदवी/पदवीका धारण केलेल्या व बंधपत्रीत उमेदवाराना प्रथम प्राध्यान देण्यात येईल. तसेच जे वैद्यकीय अधिकारी/रक्त् संक्रमण अधिकारी या पदावर तात्पुरत्या स्वरुपात थेट नियुक्ती देण्यात आली आहे. अशा कार्यरत असलेल्या उमेदवारांनी मुलाखतीमध्ये आपल्या शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेल्या सर्व कागदपत्रासह उपस्थित राहणे बंधनकारक आहे. अन्यथा उपस्थित न राहील्यास आपली नियुक्ती अन्य उमेदवाराला नियुक्ती देण्यात आल्याने समाप्त झाली असे समजण्यात येईल.

२) वैद्यकीय अधिकारी व रक्त् संक्रमण अधिकारी या पदासाठी त्यांच्या पदासमोर दर्शविलेलया शासन निर्णयातील तरतूदीनूसार एकत्रीत ठोक मानधन लागू राहील.

३) वरील रिक्त पदे तात्पूरत्या स्वरुपात दिनांक.१०/०३/२०२३ रोजी दुपारी ०४-०० वाजता थेट मुलाखतीव्दारे भरण्यात येणार आहेत. याबाबत या संस्थेच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. इच्छूक व पात्र असलेल्या उमेदवारानी (कार्यालयातून विहित नमुन्यातील अर्ज घेवून तो भरुन ) आवश्यक त्या सर्व शैक्षणिक कागदपत्रासह थेट मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे. तसेच जे उमेदवार अन्य शासकीय अथवा निमशासकीय/खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत आहेत, त्यांनी संबंधीत संस्थेकडून ना-हरकत प्रमाणपत्र व नियुक्ती आदेशाच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

४) सध्या तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत थेट नियुक्तीव्दारे कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी व रक्त् संक्रमण अधिकारी यांनी वैद्यकीय अधिक्षक/विभाग प्रमुख यांच्या मार्फत अर्ज भरुन मुलाखतीसाठी उपस्थीत राहावे.

**वयोमर्यादा:- खुल्या प्रवर्गासाठी ४० वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४५ वर्ष**

**वैद्यकीय अधिकरी व रक्त् संक्रमण अधिकारी या पदासाठी शैक्षणिक अर्हता:-** किमान एम.बी.बी.एस/पदव्युत्तर पदवी/पदवीका

टिप:-१) ज्या उमेदवाराना संचलनालयाकडुन/मध्यवर्ती निवड प्रक्रियव्दारे यापुर्वी वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता शिफारस/निवड करण्यात आली आहे, असे उमेदवार या मुलाखतीस पात्र राहणार नाहीत.

२) निवड प्राप्त उमेदवाराना आपत्तकालीन परिस्थितीच्या अनुषंगाने लावण्यात येणाऱ्या डयूटी करणे बंधकारक राहील.

वरील नमुद केलेल्या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे.मूलाखत ही दिनांक.१०/०३/२०२३ रोजी दुपारी ०४-०० वाजता अधिष्ठाता कार्यालय , शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथील महाविद्यालयीन परिषद सभागृहात होईल. मुलखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठवले जाणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच ज्या **उमेदवारानी या जाहिराती पूर्वी वरील पदासाठी अर्ज सादर केलेले असतील अथवा सदर पदावर कार्यरत असतील, त्यानी सदर जाहिरातीनुसार पुनश्च अर्ज सादर करणे/ थेट मुलाखतीस उपस्थीत राहणे अनिर्वाय आहे.** रिक्त् पदाची संख्या कमी अथवा जास्त् होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदरच्या मुलाखतीच्या दिनांकात बदल करणे अथवा सदरची भरती प्रक्रिया रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता, पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय,सांगली, यांनी राखून ठेवले आहेत.

अधिष्ठाता
पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय,सांगली.

प्रति,

१) वैद्यकीय अधिक्षक, प.व.पा.शा.रु.सांगली/शावैमरु मिरज.
२) निवासी वैद्यकीय अधिकारी, पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय,सांगली.
३) सुचना फलक, विद्यार्थी वसतिगृह, बाह्यरुग्ण विभाग,सांगली-मिरज/अधिष्ठाता दालन नोटीस बोर्ड/ ग्रंथालय,शावैम मिरज/शावैमवरुमि/पवपाशारुसांगली.
४) आय.एच.आर.नोटीस बोर्ड,प.व.पा.शा.रु.सांगली.
५) अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/मुंबई/पुणे/सोलापूर/कोल्हापूर/सातारा/अंबाजोगाई/लातूर/ नांदेड/अकोला/यवतमाळ/धुळे/औरंगाबाद/चंद्रपूर/गोंदिया/जळगाव/बारामती.

प्रत माहितीसाठी अग्रेषित-

१) अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज.
२) अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मिरज

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गो.ते.रुग्णालय संकूल, ९ वा मजला, मुंबई.
२) मा.आयुक्त्, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३) मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.